o.k.

नमुना-३

## खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याबाबत जाहीर नोटिस.

उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे यांचे कार्यालय,
पत्ता :- चांदूर रेल्वे,
दिनांक :- 22/06/2020

क्रमांक : ५९ मौजा जावरा मोळवण ज्या अर्थी, कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग अमरावती रस्ता बांधकाम प्रयोजना करीता शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्र. संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२, दिनांक १२मे, २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर,२०१५ मधील तरतुदीस अनुसरुन खाजगी क्षेत्रातील जमीन खाजगी वाटाघटीद्वारे थेट खरेदी पध्दतीने विशेष प्रकल्प विभाग अमरावती तर्फे कार्यकारी अभियंता यांचे नांवे घेण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर केला आहे.

आणि ज्या अर्थी जिल्हाधिकारी , अमरावती यांचे आदेश क्रमांक अ.का./प्र.अ./भूसंपादन/का.वि.४२५/२०१८ जिल्हाधिकारी कार्यालय दिनांक ०९/०५/२०१९ अन्वये उक्त शासन निर्णय, दिनांक १२ मे २०१५ व दिनांक ३० सप्टेंबर २०१५ आणि तदनुषंगिक शासन निर्णय, तसेच शासन परिपत्रक, महसूल व वन विभाग क्र. एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्र.१२/अ-२/, दिनांक २५ जानेवारी, २०१७ प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

त्या अर्थी, आता

१. उक्त शासन निर्णय आणि शासन परिपत्रकातील तरतुदीनुसार, मी श्री मनिष गायकवाड, उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे याद्वारे,

(एक) अनुसूची-एक मध्ये नमूद खाजगी क्षेत्रातील जमीन वाटाघाटीद्वारे थेट खरेदी विशेष प्रकल्प विभाग अमरावती तर्फे कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग , अमरावती यांचे नांवे घेण्याबाबत जाहीर नोटीस प्रसिध्द करीत आहे.
आणि

(दोन) रस्त्याच्या कामाकरीता जमीन थेट खरेदी घेतांना जिल्हास्तरिय समितीमार्फत भूसंपादन कायदा २०१३ मधील कलम २६ ते ३० च्या व शेडयुल-१ च्या तरतुदीनुसार सबंधीत जमिनीसाठी परीगणतीत होणाऱ्या एकूण मोबदल्याच्या रकमेवर २५% रक्कम वाढीव देवुन, मोबदला निश्चित करण्यात येईल.

(तीन) सबंधीत भूधारकांकडून शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे खाजगी जमीन खाजगी वाटाघाटीद्वारे विशेष प्रकल्प विभाग अमरावती तर्फे कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग अमरावती यांचे नांवे खरेदी देण्यास स्वेच्छेने तयार असल्याबाबत व जिल्हास्तरीय समितीने निश्चित केलेला मोबदला संपूर्णत: व अंतिमरीत्या स्वीकारण्या तयार असल्याबाबतची संमतीपत्र (विकल्प) मागवीत आहे.

२. सबंधीत भूधारकांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर विहित नमुन्यातील संमतीपत्रे (विकल्प) कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग अमरावती यांचेकडे दाखल करावीत.

३. संमतीपत्राचा (विकल्प) विहित नमुना उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे/ कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग अमरावती यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. तसेच सदर नमुना या कार्यालयामार्फत / विशेष प्रकल्प विभागाच्या प्राधीकृत अधिकाऱ्यामार्फत भुधारकांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

४. सदर प्रकल्पासाठी निश्चित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या आराखडयाची प्रत उपविभागीय अधिकारी, चांदुररेल्वे यांच्या कार्यालयामध्ये /कार्यकारी अभियंता, विशेष प्रकल्प विभाग अमरावती या प्राधीकृत अधिकाऱ्यांच्या कार्यालयीन वेळेत भुधारकांना किंवा हितसबंधीत व्यक्तींना जनतेस निरिक्षणासाठी खुली ठेवण्यात आली आहे.

(सुधारीत) परिशिष्ट-१

अनुसूची-१

**प्रकल्पाच्या आखणीमध्ये समाविष्ट जमिनीचा तपशिल**

**गांव :- जावरा मोळवण तालुका:- नांदगाव (खं.) जिल्हा:- अमरावती.**

| अ.क्र. | भूधारकाचे नांव | गट/ सर्व्हे क्रमांक | भूधारणा पध्दती | गा.न.नं.७/१२ प्रमाणे एकुण क्षेत्र (हे.आर) | खरेदी करावयाचे क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | राजकुमार हरीभाऊ दहातोंडे व इतर | २/१ | भो-वर्ग-१ | १.४१ | ०.०५ |
| २ | मोहन शामरावजी दहातोंडे | ३/२ | भो-वर्ग-१ | ०.७२ | ०.१२ |
| ३ | भिमराव उत्तमराव दहातोंडे | ७२/२ अ | भो-वर्ग-१ | ०.४१ | ०.०७ |
| ४ | प्रदीप जगन्नाथ दहातोंडे | ७२/२ | भो-वर्ग-१ | ०.६५ | ०.०८ |
| ५ | अरविंद त्रबंक दहातोंडे | ७२/२ क | भो-वर्ग-१ | ०.६५ | ०.०८ |
| ६ | द्वारकाबाई भिमराव दहातोंडे | ७२/२ ब | भो-वर्ग-१ | ०.६४ | ०.०७ |
| ७ | मिलींद गोविंद धवणे व इतर २ | ७२/१ ब | भो-वर्ग-१ | १.४१ | ०.१२ |
| ८ | महादेव कोळसू थोरात | ७२/१ अ पैकी | भो-वर्ग-१ | ०.७१ | ०.०४ |
| ९ | रविंद्र महादेव थोरात | ७२/१ अ पैकी | भो-वर्ग-१ | ०.७० | ०.०५ |
| १० | भिमराव उत्तमराव दहातोंडे व इतर २ श्री पंढरीनाथ संस्थान तर्फे वहीवाटदार जावरा मो. | ७२/१ | भो-वर्ग-१ | १.१३ | ०.०७ |
| ११ | विजय महादेवराव थोरात | ७३/२ पैकी | भो-वर्ग-१ | २.३१ | ०.१३ |
| १२ | गिता महादेवराव दहातोंडे | ७३/२ पैकी | भो-वर्ग-१ | ०.८३ | ०.०४ |
| १३ | हरीश्चंद्र महादेवराव दहातोंडे | ७३/१ | भो-वर्ग-१ | ४.१० | ०.३१ |
| १४ | निर्मला अण्णासाहेब दहातोंडे | ७४/२ | भो-वर्ग-१ | ०.४१ | ०.०६ |
| १५ | निर्मला अण्णासाहेब दहातोंडे | ७४/४ | भो-वर्ग-१ | ०.४१ | ०.०३ |
| १६ | अमोल अण्णासाहेब दहातोंडे | ७४/३ पैकी | भो-वर्ग-१ | १.०२ | ०.०५ |
| १७ | अमीत अण्णासाहेब दहातोंडे | ७४/३ पैकी | भो-वर्ग-१ | २.०० | ०.४२ |
| १८ | कांतेश्वर विश्वनाथ थोरात | ७५/१ | भो-वर्ग-१ | १.१७ | ०.०१ |
| १९ | राजेंद्र लक्ष्मणराव दहातोंडे | ७५/२ पैकी | भो-वर्ग-१ | ०.६७ | ०.०४ |
| २० | चंद्रकला बबनराव दहातोंडे | ७५/३ | भो-वर्ग-१ | १.१६ | ०.०५ |
| २१ | हरीश्चंद्र महादेवराव दहातोंडे | ७६/२ | भो-वर्ग-१ | २.२६ | ०.२४ |
| | **एकुण** | | | **२४.७७** | **२.१३** |
| | | | | हे.आर. | हे.आर. |

दिनांक :- 22/06/2020

ठिकाण :- चांदुररेल्वे

सक्षम अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
चांदुररेल्वे जि. अमरावती